# ગુંજા

१९५५४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३९८

REFBK-0008344
REFBK-0008344

# गुंजा

[ रुबायांचा संग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्र
अनुक्रम★ क्रमांक 93१८

द. चिं. सोमण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0008344
REFBK-0008344

मूल्य बारा आणे

: प्रकाशक :

पराग प्रकाशन
पराग बिल्डिंग्ज्,
धर्मपेठ, नागपूर.

: मुद्रक :

कुंडलराय मोहेकर
अशोक मुद्रणालय,
धर्मपेठ, नागपूर.

सर्व हक्क
लेखकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति
नोव्हेंबर, १९५४

'गुंजा' या संग्रहांतील पुढील १४२ रुबाया वरवर पाहतां स्वतंत्र वाटल्या तरी त्या आंतून एका अत्यंत सूक्ष्म चिवट धाग्यानें जोडलेल्या आहेत आणि त्या सर्व क्रमानें वाचल्यास, विशिष्ट मनोरचना असलेल्या एका व्यक्तीच्या जीवनाच्या करुण कहाणीची अतिशय अस्पष्ट अशी रूपरेषा वाचकांना दिसल्याशिवाय राहणार नाहीं!

ती रूपरेषा निरखून पाहण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहृदय वाचकांस रुबायांचा हा संग्रह मी अर्पण करतों!

—द. चिं. सोमण

## श्री. द. चिं. सोमण यांचें साहित्य

### प्रकाशित

१ भावना ( काव्य ) १९३८

२ झिमझिम ( काव्य ) १९५३

३ गुंजा ( काव्य ) १९५४

४ वाड्यांच्या वाड्यांत (कादंबरी) १९५२

### आगामी

१ सालोम आणि इतर नाटिका

२ तो गवत कापून गेला ( कथासंग्रह )

अनुक्रम ९०४५३ नि: का०४
क्रमांक-१- ९३७८ नों: दि: २०.१.७४

गानीं रमला वनीं भारती
मधुर स्वर जे तेथें घुमती
घुमवित उडती तेच खग सदा
–स्थलांतर जधीं करितें कांहीं
सर्वोत्तम तें संगें नेई ! –

–२–

प्रश्न एकदां करितां पवना
'कुठें धांवसी मला सांग ना
अस्तित्वीं तूं जोंवर असती ?'
'तोच भयद तूं !' तो किंचाळत
माझ्यापासुन गेला धांवत !

–३–

जिकडे तिकडे कुरणें हिरवीं
लाटा ज्यांवर वारा उठवी
एकीमागुन एक निरंतर
जशा मानसीं माझ्या उठतो
गणिकाश्वासें कधि एकांतीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ......५..
शाखा (स्थळ प्रत)

—४—

कुणी मक्षिका नगराजाची
सज्ज मोजण्या झाली उंची
कळतां तें तरु वदला तिजला,
'बसशिल माझ्या जर शाखेवर
तुझी पात्रता कळेल सत्वर !'

—५—

कधि अवकाशा अनिल बोलला,
'तव मर्यादा दावी मजला'
आणि नर कुणी प्रार्थी ईशा,
'प्रभो ! बलाची मर्यादा तव
कृपासागरा ! मजला दाखिव !'

—६—

निर्मल सुंदर भव्य शिंपला
पूर्व दिशेचा सहज उघडला
पहा तयांतिल सतेज मौक्तिक;
नरें निसर्गा जरी जिंकिलें
कृत्रिम असलें कां न घडविलें ?'

—७—

इंद्रधनुष्या बघुन केसरी
थरथर कांपे जधि कांतारीं
मंत्री त्याचा जंबुक वदला,
'राजा ! जोंवर चापा नच शर
निर्भय अगदीं राही तोंवर .!'

—८—

कुणी विसरुनी कोठें स्मरणी
अडून बसला तिच्यावांचुनी
आणि कथा तो कथी बालकां,
'ढाल कुणाची रणीं भंगतां
तो गुंडाळी शेला हातां !'

—९—

तरंग चंचल पाण्यावरती
अनिल चुंबुनी जातां उठती
स्वैर अनिल मी, शांत सलिल तूं
काया होई तव रोमांचित
अधर जेधवां अधरां जुळवित !

–१०–

सुम व्हावेसें वाटे मजला,
दंवबिंदूंच्या सुंदर माळा
उषा तयाच्या गळयांत घाली
तयास गानें भृंग गुंगवी
पवन सुगंधित तया डोलवी !

–११–

सुम व्हावें नच वाटे मजला
सुमनें होती चोळामोळा
शेजेवरती कधि वेश्येच्या
कृष्ण मधुप मधु त्यांचा पळवी
वात पाकळ्या त्यांच्या उडवी !

–१२–

थकवा येतां प्रेतवाहकां
यात्रेंत दुजे करीत सुटका
परंतु तिरडी कण्हते संतत
तिला कशाला हवी मुक्तता
चिरविश्रांती देत जर चिता !

–१३–

कधीं एकदां ऐसें घडलें
गगन घनांनीं काळचा भरलें
आणिक सहसा तुटुनी चपला
करित गर्जना द्रुत पाताळीं
दुभंगुनी शिव–मंदिर गेली !

–१४–

उजेड अंधुक सभोवतालीं
प्रकाश छाया एक जाहली,
अंधुकतेची करितां व्याख्या
अभाव सूचित कथनीं केवळ
वैशिष्टचाचा तेजतमांतिल !

–१५–

तनू कोवळी ऐन यौवनीं
कंठीं कोकिल ज्योत्स्ना नयनीं
भांग वांकडा, रुमाल हातीं
मिरवी कुंकुम याची कांता
सहल कराया दोघे जातां !

–१६–

सूर्यविकासी कमल विकसतें
भूवर दिवसां रवितेजें तें
रवितेजानें फुले चंद्रमा,
सूर्यविकासी कमल विकसतें
गगनीं रात्रीं सुंदरतर तें !

–१७–

दिसूं लागतां क्षितिजिं पताका
सैन्यामध्यें वाजे डंका
जो तो झाला सुसज्ज सैनिकं,
आणिक इकडे राजमहालीं
होती मजलस भरास आली !

–१८–

सतार कोणी घेउन आला
दारीं त्याच्या विकावयाला
स्वस्त खरेदी केली त्यानें,
आयु तथापी सर्वहि खर्चुन
जमे न त्याला विशेष वादन !

स्थळप्रत
अनुक्र. वि:
क्रमांक नों: दि:

कुणी एकदां देई ग्वाही
'स्वार्थावांचुन मानव नाही!'
कुणी विचारी बावरलेला,
'स्वार्थ कोठला साधायाला
मानव आपण निंदित सुटला?'

–२०–

गंडस्थलमद कुणा गजाचा
ये चाखाया भृंग कोठचा
कमल तोडुनी गजें तेधवां
मदामधें तें अपुल्या भिजवुन
भ्रमर चिरडिला त्यावर घेउन!

–२१–

अप्सराच तूं पटवित केवळ
वक्ष गौर तव प्रमत्त कोमल
अप्सराच तूं कारण त्यांवर
बघे दुज्यांच्या कररेषांचा
ठसा उमटला कितिदां साचा!

–२२–

नको विस्मरूं स्वार्थी सगळे
तुझ्याभोवतीं जे हे जमले
लखलख करण्या तव तेजानें;
याच कारणें सूर्याभवतीं
कितीक गोलक करिती दाटी !

–२३–

अधरांवरती हास्य मनोहर
स्रवते वाणी अमृत निरंतर
आणि लोचनीं सुखद चंद्रिका
दुःशीला ही परंतु युवती
रत्नपात्रिं विष कधि कधि जगतीं !

–२४–

तस्कर कोणी अपुल्या गेहीं
अवचित दुसरा तस्कर पाही
शोधित होता धन जो त्याचें,
ओळखून अन् पिता आपुला
हांसत लपला तस्कर पहिला !

-२५-

निद्रेमधि तूं सहजच वळतां
कनककंकणें तुझीं वाजतां
सूत्रें हलक्या हातें वांधी,
सूक्ष्मरवेंही पापी कारण
अनुभव उभयां उठती दचकुन !

-२६-

भुताटकीची जुनी हवेली
हसित केधवां कधि किंकाळी
शुभ्र आकृत्या जात तरंगत,
अभद्र जग तें जिंकायाला
अभद्र तांत्रिक सिद्ध जाहला !

-२७-

मृत पत्नीची हांक ऐकुनी
जाग घेत तो रोज दचकुनी
रोज आणखी पुशी आंसवें
कुणा दुजीचीं शय्येवरल्या
स्मृती जियेच्या स्वप्नि उमलल्या !

–२८–

रविबिंब न जों वरती आलें
इतर खगांचे थवे उडाले
चकोरगण पण खिन्न बैसला,
करण्या गौरव गगननृपाचा
कशी सजावी त्यांची वाचा !

–२९–

साक्षात्कारीं मूर्ति प्रगटुनी
अभय दे जधीं हात उचलुनी
लोचन झाले त्याचे विस्मित,
होत्या रेषा ईशकरतलीं
सत्तासीमा गोचर झाली !

–३०–

प्रेत पाहतां वस्त्राच्छादित
गमे बिचारा कुणि निद्रारत
परि अवलंबें हो भ्रमनिरसन,
एकमुखें स्तुति जेव्हां करिती
जमलेले ते त्याच्याभवतीं !

-३१-

निशा राक्षसी अभद्र भेसुर
ये सामोरी बघतां प्रियकर
किती तियेचा वर्णूं वल्लभ,
तेज रवीचें घेउन उसनें
क्षयी कलंकित ये डोलानें !

-३२-

पार व्हावया व्योम-वाहिनी
निघे साहसी तारा कोणी
तथापि निमिषीं भस्म जाहला
कर्षायाला धरणी जागी,
अचिंत्य विपदा प्रगतीमार्गी !

-३३-

गुलाबपुष्पा अरुण बोलला
'रंग मनोरम तव मज रुचला'
गुलाब वळवी मान सुलज्जित
तोंच खुडी त्या कोणी बाला
जिच्या कपोलीं अरुण थाटला !

—३४—

बालपणीं तो हंसला रडला
जधि तारुण्यीं रतला श्रमला
अन् वार्धक्यीं सचित अंगणीं
आणिक जेव्हां होत कलेवर
राख उडाली झणि वाऱ्यावर !

—३५—

तरल बुद्धिचा शोधक कोणी
नयनमनोहर पुष्पें आणी
सौंदर्याची व्याख्या करण्या,
सूक्ष्मदर्शकीं मृदुल पाकळ्या
अवाढव्य परि विरूप दिसल्या !

—३६—

गरगर काळीं फिरवित बुबुळें
दंत दाखवित हांसत सगळे
माथ्यावरचे ओढित तंतू
वदला वेडा, 'तव लावण्यीं
अद्भुततेची सीमा रमणी !'

–३७–

तंबूमधलीं हिंस्त्र श्वापदें
बघती टकमक जन आनंदें
गज लोखंडी कारण भवतीं,
प्रेक्षक जेव्हां पूर्ण सुरक्षित
तदा भयानक चित्ता रमवित !

–३८–

घननग शिखरें लाल रुपेरी
काळवंडलीं पुनरपि सारीं
जातां भास्कर गगन सोडुनी,
अन्यांवरती जें अवलंबुन
कसें टिकावें अन्यांवांचुन !

–३९–

मल्ल भयानक हाय ! कोसळे
कसें अचानक हृदय थांबलें,
हौद्यामधला दुजा दचकला,
प्रेक्षकांतला एक सांपळा
जातां खोकत चकित हांसला !

-३४-

बालपणीं तो हंसला रडला
जधिं तारुण्यीं रतला श्रमला
अन् वार्धक्यीं सचित अंगणीं
आणिक जेव्हां होत कलेवर
राख उडाली झणि वाऱ्यावर !

-३५-

तरल बुद्धिचा शोधक कोणी
नयनमनोहर पुष्पें आणी
सौंदर्याची व्याख्या करण्या,
सूक्ष्मदर्शकीं मृदुल पाकळ्या
अवाढव्य परि विरूप दिसल्या !

-३६-

गरगर काळीं फिरवित बुबुळें
दंत दाखवित हांसत सगळे
माथ्यावरचे ओढित तंतू
वदला वेडा, 'तव लावण्यीं
अद्‌भुततेची सीमा रमणी !'

-३७-

तंबूमधलीं हिंस्त्र श्वापदें
बघती टकमक जन आनंदें
गज लोखंडी कारण भवतीं,
प्रेक्षक जेव्हां पूर्ण सुरक्षित
तदा भयानक चित्ता रमवित !

-३८-

घननग शिखरें लाल रुपेरी
काळवंडलीं पुनरपि सारीं
जातां भास्कर गगन सोडुनी,
अन्यांवरती जें अवलंबुन
कसें टिकावें अन्यांवांचुन !

-३९-

मल्ल भयानक हाय ! कोसळे
कसें अचानक हृदय थांबलें,
हौद्यामधला दुजा दचकला,
प्रेक्षकांतला एक सांपळा
जातां खोकत चकित हांसला !

-४०-

जगा ! काय मागूं तुला आणखी
म्हणूं, 'घाल' कां 'अमृत माझ्या मुखीं'
तुला शक्य तें सर्वही तूं दिलें
जधीं मोहि हितगूज तव ऐकुन
असा निश्चयें जाहलों दुर्जन !

-४१-

रडे हा मिळे अन्न ना याजला
रडे हा जधीं यौवनीं एकला
हंसे मी इथें पाहुनी आणखी
हंसे तो जरी अन्न ना त्याजला
हंसे तो जरी यौवनीं एकला !

-४२-

निराकार संतुष्ट स्त्रष्टा पुसे
'मुने ! दाखवूं रूप दर्शनि कसें ?'
'जिच्या मृत्युनें तीव्र वैराग्य हें
प्रभो ! दाव कांताच राखेंतली !'
तदा जटिलवाणी झणीं बोलली !

-४३-

जधीं आस साकार मम जाहली
कुणी सुंदरा उत्सुका प्रगटली,
करीं पुष्पमाला वरी भृंग ते
थव्यांतील ज्या दोन वदनावरी
बघे काम भ्रमरीच नयनांतरीं !

-४४-

इथें एक ठिणगीच समया तिथें
तिथें दीपिका अन् मशाली इथें
चितांचा कुठें जाळ, वणवा कुठें
कुठें जाग ज्वालाद्रि घे सुप्त तो
हृदीं आग सर्वत्र जी पाहतों !

-४५-

कुणी गदगदां हांसुनी मद्यपी
पथीं बोलला मज तमीं 'मद्य पी !'
बळें ओढुनी त्यास नेलें पुन्हां
अम्हां सोडुनी जेथुनी तो पळे
सदा शिष्य गुरुलागिं जपती भले !

—४६—

नभीं रम्य उद्यान जें शोभतें
फुलें कोठलीं ? मूढ ! पाषाण ते
कसा गंध त्यांचा इथें यायचा
तिथें वात ना गंध ना ज्यापरी
भरीला तिथें आग गगनोदरीं !

—४७—

पिशाच्चें स्मशानीं कधिं नाचती
कुणा मांत्रिकाच्या चितेभोंवतीं
अनेकप्रकारें तया निंदित,
परी लांकडांतून त्यां पेटत्या
उठे भूत त्याचें खुणावीत त्यां !

—४८—

म्हणे एकदां भक्त त्या मूर्तिला,
'प्रसन्न न जरी आज होसी मला
इथें प्राण देईन पायांवरी !'
प्रसन्न न परी हो तया दैवत
नि तो भक्तही प्राण ना त्यागित !

—४९—

कधीं बोलली त्यास वेश्या कुणी,
‘जरा प्रीत घे प्रियकरा! जाणुनी
तुझ्यावांचुनी कांहिही मज नको,
हि-यांच्याहि राशीस लाथाडिन!’
—झणीं जाग घे आणि तो चमकुन!

—५०—

नगारा झडे मंदिरीं पूजन
नगारा झडे संगरीं कंदन
नगारे नभीं आणि सौदामिनी
कधीं पूजितां दामिनी कंचनी
धपप्पे उरीं हृदय—समरांगणीं!

—५१—

वराहा वदे मृग कधीं माजल्या,
‘असें साम्य दोघांमधें आपुल्या
वृथा तुच्छतेनें मला पाहसी
उभय केसरी ना जसे आपण
तसे उभय ना आणि दर्दुर पण!’



मराठी ग्रंथ संग्रहालय

-५२-

कुणा आंधळ्या चित्रकाराप्रती
कथी साधु कोणी, 'तुला दृष्टि ती
असे शक्त मी द्यावयाला पुन्हां !
जरी ना करीं घेसि तूं कुंचले !'
परी चित्रकारें न तें मानिलें !

-५३-

जरा क्रंदुनी स्वस्थ हो बालक
टणत्कार घुमवी जरा कार्मुक
जरा कोपुनी शांत झाला यती
जराग्रस्त अस्वस्थ मी हा परी
जरी यौवनीं ती दिसे क्षणभरी !

-५४-

अजित अप्सरांना जधीं तो मुनी
सुरेंद्रें नवी अप्सरा घडवुनी
तिला धाडितां अंतीं त्याच्याकडे
तिच्या जाहला मुनि झणिं अंकित
असें नाम 'आशा' जिचें विश्रुत !

–५५–

गगनीं चंद्रमा आणखी भास्कर
असे यायचे प्रियतमे! जोंवर
अशी कौमुदी नी उषाही तशी
नसायास कांही नसे कारण
जरी पाहण्या राहुं ना आपण!

–५६–

सदा सज्ज सज्जांत वेश्या कुणी
परी पाहिना एकही थांबुनी
अखेरीस ये एक तें वाहन
चढाया जिना लागली मैत्रिण;
निराशा कधीं हो खरी दारुण!

–५७–

जरा दृष्टि चौफेर टाकी खुळ्या
पहा रक्तनिधि हाय! फेसाळला
रुधिरबिंदु तव एक कां पाहुणी
कुणा यायची कींव रे दुर्बला!
कुठें दूर जा, तेथ रड मोकळा!

–५८–

'पुन्हां त्याच पाशीं पहा बद्ध मी!'
'अशी चूक होते कशी नेहमीं?'
'अरे, पाश अदृश्य हा जादुचा
पथि दावि ती चुंबना आतुर
नि घे ओढुनी धांव घेई जर!'

–५९–

मुनी कोठला मागुनी घे वर
'प्रभो! स्वार्थ सारा जळो भूवर!'
जरा हांसुनी ईश उचली कर,
धरागोल तात्काल हा पेटला
मुनीच्या जटा प्रथम जधि भडकल्या!

–६०–

तुझ्या सावजीं तीर माझा घुसे
वृथा वाद कां माजवीसी असे
नदीच्या तटीं कळप बघसी किती,
तिथें दाव कौशल्य तव निस्तुल
नसे तेथ जाण्यास मातें बल!

–६१–

नकाशा जगाचा करीं घेउनी
कुणी नृप कण्हे सर्व जग जिंकुनी
वदत 'काय जिंकूं अतां ?'–खिन्न हो,
वदे त्यास सामान्य वेश्या कुणी
'हृदय मूढ रे ! जिंक मम झुंजुनी !'

–६२–

गिळी मत्स्य विक्राळ सरसावुनी
कुणी एक नौकेतली कंचनी ;
कुणी जेधवां पोट त्याचें चिरी
दिसे सांपळा आणखी तत्करीं
असे आरसा जो बिचारा धरी !

–६३– [ वरमंगला

एक उदधीवरी उठति लाटा किती
एक ज्वालामुखी गर्जना परि किती
एक शस्त्रें किती न्हाणिले शोणितें
एक अतकमुखीं कैक सामावले
एक हृदयामधें नित्य किति वादळें !

—६४—

दाव त्याला दया जा कुणा गांठुनी
दान दे त्याजला खूप सत्कारुनी
मोक्ष आशीर्वचें त्याचिया लाभणें;
पुण्य त्या द्यावया येथ मी हा उभा
जो निघे जावया आत्मघातें नभा !

—६५—

'हुडकिलें शेवटीं दीप ! तुजला तमीं !
असति कोनीं जिथें येत तेथेंहि मी !'
'शोधुनी काढिलें मज कशाचें तुवां,
लपुनि नच राहुं दे तेज तिमिरीं मला
सहजसें डोळसा ! जें दिसे तूजला !'

—६६—

पन्नगा ! पाय मम तव मुखावर पडे
तव न विषदंत ते वारणें सांकडें
धडपडीनें तुझ्या कळवळा येत ना,
हाच जरि पाय मम पडत मागें जरा
पाठवीतास तूं यमगृहीं निष्ठुरा !

–६७–

खिन्नशी जाहली काव्यदेवी कधीं
रसिक कुणी जेधवां मृत्युवक्त्रीं जधीं
कवि कराया तिचें लागतां सांत्वन
बोलली, 'नच तुम्ही सर्व दुःखीं कसे
दरवळे गंध कां वात जेव्हां नसे ?'

–६८–

व्यर्थ आश्वासनें तूं जगा तिज दिलीं
आणि आशा पिशी खदखदां हंसविली
ऐकण्यालागिं घे शोक आतां तिचा,
शेवटीं तिज कळे फसविलें तूं तिला
शोक म्हणुनी तिचा विकट हा चालला !

–६९–

लाजतां कंचनी तो विचारी तिला,
'कोठल्या कारणें रक्तिमा थाटला ?'
कानिं त्याच्या हळूं ती वदे, 'जिवलगा !'
तोंच तो खदखदां हांसुनी बोलला,
'धन्य तं फसविलें नेहमींच्या गला !'

—७०—

'सांग पांथस्थ रे ! तुडविसी कां मला ?'
'असली माझा पथा ! म्हणुनी लत्ता तुला !'
'ईश्वरा ! तुडविसी कां अम्हां मानवा ?
'सर्व माझे तुम्ही म्हणुनी सम पदतलीं
ज्यापरी तूमची नित्य पंथि सांवली !'

—७१—

एक सत्वर पळे, चकित स्थानीं कुणी
एक जरि बैसला, ओणवा कुणि गणीं
एक हो आडवा, एक घेई उडी;
एक हा एक तो हो उताणा परी
एक अंकावरी, एक तिरडीवरी !

—७२—

घे शिला काननीं कोणि कारागिर
खोदण्या भारती तींतुनी सुंदर
मूर्त तों त्या स्थलीं प्रगटली मर्दिनी,
आणि घाकें तिच्या कुशलता खर्चुनी
घोरदर्शन तशी खोदि तो मर्दिनी !

—७३—

वश तिला मुनि न हो जरि दमे नर्तनीं
खिन्न गेली नभीं उर्वशी परतुनी
स्वप्नि मुनिनें परी तिज निशीं भोगिलें,
सुप्त ज्या कामना लोकचित्तामधीं
स्वप्नजगिं विहरती स्वैर निर्भय कधीं !

—७४—

केधवां बोलला दीप पवनाप्रत
'कां मला विझविसी सांग बिनदिक्कत ?
स्मरत अपराध ना कांहि केला तुझा !'
'तूं पतंगांस कां जाळिसी कथ मला,
निरपराधोच ते ?!' — पवन त्या बोलला !

—७५—

भित्तिचित्रांतली ठाकतां स्त्री कुणी
तो उठे क्षणि निशीं अन् निघे मागुनी
आणि कांता तशी अप्सरा निस्तुला !
कधि नको होतसें जरि असाधारण
तेंच तें वाटतें त्याज्य निष्कारण !

—७६—

ग्रासिला केतुनें पूर्ण हा भास्कर
पसरली सांवली अशुभ अवनीवर
झांकिती लोचनें लोक मनिं चरकती,
कधि अमंगल घडो कांहि कोठेंहि तें
सांवली आपुली लांबवर टाकतें !

—७७—

नर्तकी कधि कुठें नाचतां मंदिरीं
सहजशी सुंदरा वेष अपुरा करी
सहज विस्मित सभा सुरुपता पाहुनी
खुण सहजच करी धनिक तिज हांसत;
सहजसें जें घडे सहज जनिं संमत !

—७८—

बोलली चंडिका भारतीला कधीं
' कैक वीणा अशा तडकताती जधीं
देत हुंकार मी खवळुनी तांडवीं '
वदत देवी, ' अशी एक वीणा पुरे
क्रोध सारा तुझा निववण्यासी त्वरें ! '

–७९–

एकदां सहन जें पूर्ण केलें तसें
आजला होत तें हंत ! दुर्धर असें
ईश ! ये आंसवें पूसण्या तूंच हीं
वार निःशब्द मी प्रथमचा साहिला
वार वारावरी हा परी बैसला !

–८०–

' कोण मी कोठला ' पुससि कां कंचनी
दे तनू गौर तव मोल हें घेउनी
बघ तुला देत मी दाम खोटे न हे
रोख सौदा जिथें, प्रेम नाहीं जिथें
वायफळ चौकशी नच कुणा शोभते !

–८१–

सान कुणि बालिका बालकाच्या परी
कौतुकें केधवां वेष सारा करी
दर्पणीं आणखी मूर्ति निज पाहतां
लक्ष गेलें तिचें कुंकुमाच्याकडे
तें जरी नच पुशी, तें न तिज आवडे !

–८२–

दोन जरि लोचनें एक रमणी दिसे
कैंक जरि दर्शनें एक लागे पिसें
एक लागे पिसें कैंक परि आंसवें
कैंक अश्रूंपुढें दोन तीं लोचनें
दोन त्या लोचनीं अश्रु ना मावणें !

–८३–

सान पर्णावरी दोन कीटक कुणी
प्राण लावुनि पणा झुंजती कोपुनी
एक झाला जयी मृत दुजा जाहला
क्षुद्र ती द्वंद्वभू द्वंद्व तें ज्यापरी,
क्षुद्र त्याही रणीं प्राण जाती परी !

–८४–

'कां असा नेहमीं निंदिसी कंचनी
एकही नच दिसे कां जरा सद्‌गुणी ?'
'एक केव्हां कधीं आठवे भेटली
स्वागताची कधीं घे न जी किंमत
नेहमींचा कुणी ये जधीं झिंगत !'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम १०५५३ वि: ८३१०५
क्रमांक- ९३१८ नों: दि: २५/३/

जेथ पुष्पाविना दरवळे परिमल
जेथ चंद्राविना पौर्णिमा निर्मल
नसुन वीणा जिथें मधुर येती स्वर
पुष्पवृष्टी सदा जेथ गगनांतुनी,
तेथ जाणा कुणी सत्कवी चिंतनीं !

–८६– [ लीलारति

अंधार ओतती पाण्यासंगें ढग
दामिनी दाविते जलमय झालें जग
पथ अनोळखी मी तुडवित हा चाललों,
परि नको सोबती मज कोणी दीप वा
सोबती व्हायचा तस्कर विझतां दिवा !

–८७–

जरि तुला तेधवां ओझरतें पाहिलें
तूं माझी क्षणिं त्या पुरतें परि जाणिलें
ते हावभाव नी चंचल ते लोचन
तात्काळ सांगती गणिका तूं सुंदर
स्मरलेंहि उधळती रत्नें माझे कर !

—८८—

कुणि निघे जेधवां करण्या तीर्थाटन
पथ नेइ एकदां त्याला रानांतुन,
पाहून तांवडी तरुंतुन ती पश्चिम
तो जागि कोसळे वणवा मानून ती,
संकटीं कल्पितच बहुदां खुंटे गती !

—८९—

बघ दाट भोवतीं अपुल्या दाटे धुकें
दे अधर आपुले आतां पथि लाडके !
कोणी न पाहणें आतां गे ! आपणां,
जें राजरोस ना घेतां ये आपुलें
तें संधि लाभतां पळवावें प्रेमले !

—९०—

जाहले फरारी आरोपी कायम
खिडार पाडुनी भितीला भक्कम
कां वृथा धांवपळ करितां आतां जन
त्या प्रेमी जीवां जेव्हां तुम्हि कोंडिलें
एकत्र, तेधवा निर्भय ते जाहले !

-९१-

कधि भक्ति कोठल्या भक्ताची देखुन
त्या उग्र चंडिका साक्षात् दे दर्शन
तिज परी पाहतां पूजक हो मूच्छित,
जें कधीं लाभतां असह्य होणें असें
मनुजें न झटावें घेउन त्याचें पिसें !

-९२-

कवि एक उपवनीं दुःखें उद्गारतां
'मृदुकाय मनोहर कुसुमें जीं पाहतां
तीं हाय ! परि उद्यां गळणें धरणीवर !
कवि दुजा वदे त्या, 'अशींच परि निश्चित
व्हायचीं उद्यांही नवसुमनें विकसित !'

-९३-

श्वापदें केधवां गोळा झालीं वनीं
ठरविण्या आपणां राजा दुसरा कुणी
नच एकमत परी त्यांचें होई मुळीं;
गंभीर गर्जना घुमतां पण काननीं
तीं सर्व उधळलीं एकमतानें क्षणीं !

–९४–

'कां फुलवि गुलाबा काटयांमधिं ईश तो ?'
जो सौंदर्याचा भोक्ता तें रक्षि तो !'
'कां कानन–कुब्जा कंटकमय बाभळी ?'
'वैशिष्टय ठेविलें अंगीं कांहींतरी !'
–जा शंका पुसग्या श्रद्धा जर अंतरीं !

–९५–

तूं सौख्य मिळविण्या झटसी रात्रंदिन
श्रम अखंड तूझे देती जें मिळवुन
तें दु:खच नच कां कष्टविलें तुज जयें,
मानवा ! कसें ना इतुकेंही तुज कळे
सुख खरें तेंच जें आयासाविण मिळे !

–९६–

ये राजरोस गे ! भरल्या मार्गांतुन
जर कुणी चौकशी केली तुज हटकुन
बिनघोर तयांना कथ तूं, 'मी जातसे
त्या एकीकडल्या ढांसळल्या मंदिरीं
घे मूर्ति ज्यांतली भक्तां अंकांवरी !'

–९७–

जरि तूं न मंथितां लोळे पदिं सागर
हे शैल ! मान ना श्रद्धायुत अंतर
नग तुंगतर किती पचवी पोटामधें
तुज आर्द्र करूनियां कह्यांत नट घेतसे
मंदारवंशजा सूडें झिजवीतसे !

–९८–

सुरदूत केधवां आला गगनांतुनी
घट थोर दिव्य तो अमृताचा घेउनी,
त्या बघुन जनांनीं केला झणिं गलबला
' ने परत परत तें दूता रे ! अंबरीं
अरि अमर आयुचे होणें आम्हां परी ! '

–९९–

जें सुलभ तयांना दुर्लभ व्हावें मला
हा शाप प्रभूनें कठोर मजसी दिला
जें पाप तथापी शापा हो कारण
तें अनेक वेळां घडण्याचा संभव
नच मला कल्पना त्याची जोंवर लव !

–१००–

बघ, नभीं विखुरल्या लक्षावधि तारका
जातसे खरोखर त्यांच्या मधुनीच कां
शेवटीं मृतात्मा वरती स्वर्गाप्रत,
मग तोच असावा टाकित खालीं कधीं
स्मृतिचिन्ह अंतिचें तारा– मार्गामधीं !

–१०१–

नभसरीं उतरल्या तारा बुडतां रवी
'हीं रत्नें माझीं माझीं !' गाई कवी
'प्रभुतेज फांकलें !' आस्तिक सांगे 'पहा'
शास्त्रज्ञ लावुनी दुर्बिण ठरवी प्रती;
कुणि वेडा चवथा त्रयीस हांसे अती !

–१०२– [ कालगंगा

काय मिळतें मज डिवचुनी सांग जगता ! तूजला
दुखविलें वा सांग केव्हां, स्मरत अगदीं ना मला
एकला आलों नि जगतों, एकला जाईनही !
तो गुन्हा जर मानितोसी दे कुणी रे ! सोबती
मजहि मिळणें शांति थोडी दुःखमय या जीवितीं !

–१०३–

बाहुल्या येथें कळीच्या कुणि दुकानीं मांडित
घ्यावयाच्या त्या कशाला मोजुनी परि किंमत
नाचती, गातात, हंसती, अर्थ कांही त्यांत कां
भावना यंत्रांस नच या, हृदय नाही त्यांजला
चीड येई नाटच त्यांचें पाहतांना हें मला !

–१०४–

वाट चुकतां कोणि रानीं रात्रि बघुनी दीपिका
दूर कोठें, शीघ्र जाई त्या स्थलाप्रत नेमका
देव चोरांचा तिथें तो; दीप तेवे त्यापुढें,
ज्यापुढें दिधले बळी त्यां तस्करांनीं हांसत;
जेधवां हो दैव वैरी घात होई निश्चित !

–१०५–

बाण बोले ‘ हाय ! जोडी मृग वधोनी पातक !’
पुटपुटे ज्या दुःखमग्ना, ‘ मीच धाडी सायक !’
चाप मानी शक्य नव्हत्या रक्तधारा त्याविना,
आणि रानीं मांसखंडें क्षुधित भिल्लें भाजिलीं
दान करुनी चर्म मुनिला नरकभूही टाळिली !

—१०६—

पुच्छ तारा रक्तवर्णी प्रगट झाली अंबरीं
दृश्य बघुनी विकट तसलें धडधडे लोकांतरीं
अन् भविष्यें वर्तली कीं काल हरणें भूपती!
मानलोलुप पट्टराणी जाहली कासाविस
परि हंसाया पुत्र लागे छत्रवादी वारस !

—१०७—

केधवां तूं भाट होसी आणखी नृप केधवां
वीर केव्हां होसि केव्हां मागसी वा जोगवा,
बहुरुपी तूं सहज इतरां तव कलेनें ठकविसी;
जें करितसूं तेंच करिसी मागसी परि बक्षिस
नवल वाटे पाहतां हें मजसि तूझें धाडस !

—१०८—

शत्रुरक्तें क्षेत्र विस्तृत पूर्ण झालें तांबडें
या जयाचे गा पवाडे, वाजवा हो चौघडे
साह्य केलें देशभक्तां घोर समरीं ईश्वरें !
वार रिपुच्या जे शरीरीं शौर्य अमुचें दाविती
वार अमुच्या जे शरीरीं भूषणें जणुं शोभती !

-१०९-

पाय पुजिले मी जयांचे मारिल्या लत्ता तयें
दूर गेले नाम ज्यांचें हाय ! ओठीं नित्य ये
केधवां ज्यां याचिलें ते अचुक ठरले तस्कर;
दूर जातां हृदय हरुनी मज असे लाथाडुन
तूंच राज्ञी योग्य लोकां आज देसी पटवुन !

-११०-

भर दुपारीं वाळवंटीं कोण निजला हा पिसा
जगिं कुणी ना काय याचे, देह दंडी कां असा
यास बघती तुंग लाटा सागराच्या लांबुन
ऊठ वेडचा ! तरु तिथें तो, गार तेथें सांवली
'येथ पडुं द्या, येथ मम ती' या जगानें जाळिली !

-१११-

स्वर्ग वर्णी व्याघ्र कोणी बांधवीं निज रंगुनी,
'चापधारी दुष्ट नर ना फिरति तिथल्या काननीं
जागजागीं तेथ निर्झर, मोठमोठचा त्या गुहा
मृग तिथें जे बहुत असती पांगळे ते जन्मती
व्याघ्र सारे अमर तिथले पूर्ण सौख्यीं नांदती !'

-११२-

आणखी दे आणखी घे विरह अजवर साहिला
आज सरले भोग अपुले, अंति मज तूं मी तुला
सौख्यसीमा आज गांठूं, एकदां ? छे, छे, खुळे !
दुःखसीमा रोज कितिदां गांठली गे, आपण
आजपासुन फेड त्यांची उचित करणें भागुन !

-११३-

धरण फोडी लाल लोंढा, पूर आला केवढा
समर कुठला वाहवीतो रक्तनद हा तांबडा
जन घडा घ्या देत धडका बांध फोडा शेवटीं,
प्रगतिमार्गी आडवें जें येत सारा दूर तें
शांति सोडा जी रिपूंचे बाग बहरीं उठविते !

-११४-

गात कोणी प्रेमगीतें जाय पंथें नेहमीं
लोक म्हणती, ' वेड याचें व्हायचें कधि हें कमी ?'
साफ गेलें वेड त्याचें आणि अवचित त्या दिनीं
शब्द कोणी जधि तयाच्या कानिं ऐसे बोलला,
' प्रेमवेडया ! दुर्दशा तव दुःख देई तीजला ! '

-११५-

डोह अगदीं शांत, अगदीं शांत सृष्टी भोवतीं
प्रेतही पाण्यावरी हें शांत लोचन पाहती
कोण कुठली कोण जाणें परि नभीं गेली खरी
शांत नभही हें तथापी पाहतों माथ्यावर;
शांतिही मम लव न ढळली नवल नाही पळभर !

-११६- [ भूपति

ना कधींच जिंकी जो ललनेच्या हृदया
आयुष्य तयाचें समजा गेलें वाया
माधुर्य जीवना स्त्रीप्रेमाविण नाही;
नर कशास्तव जगीं, प्रश्न न त्याला पडतो
करपाशीं मृदु त्या धुंदमत्त जधि होतो !

-११७-

मावळला सविता सागर पडला काळा
लोपला नीलिमा नयनाल्हादक सगळा
थांबली न याची परी गर्जना गूढ
जी तदा ऐकतां वाटे ऐकावीशी
ती चित्त चरकवी आतां घुमतां ऐशी !

-११८-

सर्वस्व आपुलें जीवनभूमी जगतीं
नर रक्षण करण्या मान्य योजना करिती
घालिती कुंपणें प्रेमाचीं कांटेरी !
परि चार दिनांनीं जागा बाहेरील
तीं संरक्षाया भूमी घे आंतील !

-११९-

व्यापून उरतसे आकाशा अवकाशा
विभु जेथें तेथें विश्वामाजीं ऐसा
हिम वर्षावीं जो उल्कापातीं जाणा !
मुनि परी विसरले वाटे स्थानें दोन
जें चित्त नास्तिका आणि तया जें तपन !

-१२०-

तव चिताभस्म मी अंगाला फांसोनी
येऊन एकला बसलों येथें रानीं
तप आचरण्याला कठोर अतिशय आतां,
स्वर्गस्थ जरी तूं येईन तेथें खास
मम तपोबलानें अंतीं भेटायास !

-१२१-

कुणि गणिकागेहीं गेला सायंकाळीं
ठरवून तयें अन् सौदा नाणीं दिधलीं
शय्येवर जेव्हां तिला पुशी तो नांव
ती वदली, ' माझें गोड ऐकण्या नाम,
पडतील तुम्हांला आणिक कांहीं दाम !'

-१२२-

तम दिसे दिसेना तमांतील पण कांहीं
तव लोचन काळे जरी नित्य मी पाही
एकही दिसे ना विकार मजला त्यांत;
अनुभवें शिकविलें सावध असणें उचित
कृष्णता जेधवां अंतस्था झांकित !

-१२३-

बोलली मंचकीं कधीं शशीला रजनी
' येतोस कधितरी, हृदयीं दुसरी कोणी !'
विधु आवेशानें उकली अपुलें हृदय;
पाहिली निशेने तिथें आपली मूर्ती
जी तशीच तेथें अजून जनही बघती !

-१२४-

तव काया सीमा सौंदर्याची वाटे
सामर्थ्य तुझ्या या लावण्याचें मोठें
किति महिमा गाऊं त्याचा अष्टौप्रहर !
अनुरक्त जाहले विरक्त तूझ्यावरती
अनुरक्त आणि जे विरक्त पुनरपि अंतीं !

-१२५-

खडकावर नौका अपटुन फुटलें बूड
मोडलें सुकाणूं चिंध्या झालें शीड
दुर्दैवें केली पराक्रमाची शर्थ,
खडकावर परि मी वसलों निर्भय चित्तें,
कधिं शस्त्र शत्रुचें अपजय त्याचा करितें

-१२६-

भूपती होउनी हुजऱ्या स्वप्नीं कोणी
बैसला मंचकीं राजाच्या जावोनी
भोवतीं आणखी प्रधानही तो जमवी
जे सगळे असती हलकट दुसरे हुजरे
तें स्वप्नींही ना तयास करिती मुजरे !

–१२७–

घेऊन पिंजरा करीं कुणी सोन्याचा
बोलला शुकांना, ‘ शिरा, स्वर्ग हा तुमचा ! ’
परि एक शुक तया वृद्ध लांबुनी वदला,
‘ स्वर्गास आमुच्या परी कासया दार ?
स्वर्गास विटुन का येऊं कथ बाहेर ? ’

–१२८–

मी जरी कसाई मला बायकापोरें
जगवितों तयांना पाप जोडुनी बा रे !
साधिण्या स्वार्थ ना केवळ कापी गायी
तूं मुने ! परंतू मोक्षासाठी रानीं
बसलास येउनी विसरुनि कांता जननी !

–१२९–

मुद्दाम कधिं कुणी पहात कांचेंतून
बोलला जनांना, ‘ हिरवें आहे गगन ! ’
ओरडा जाहला ‘ वा, वा ! हिरवी कांच ! ’
मग हांसहांसुनी त्याने हातांमधली
दाविली तयांना कांच असे जी पिवळी !

-१३०-

कुणि विधवा केव्हां शोधित असतां कांहीं
लागला करंडा तीच्या हातीं गेहीं
जीं ढाळि आंसवें नकळत ती त्याच्यांत
तीं कुणा न कळलीं नंतर तो पाहोनी,
अंतस्थ येत ना बाह्यदर्शनें ध्यानीं !

-१३१-

खवळून दुष्ट हा निरर्थ झंझावात
सत्वेष तरुवरां धरणीवर पाडीत
कडकडाट शिरतां मेघकपाटीं काळचा
जो प्रतिध्वनी उठे कांपवि तोही भुवन;
जें कृष्ण साथ दे कृष्ण कृतींना जाण !

-१३२- [ वल्लभा

सावध किती राहूं असा मी या जगीं रात्रंदिन
सांगूं कुणा हृदयांतलें विश्वास पुरता ठेवुन
फसवित वारंवार हे लोक असुनी मी सावध
कां धूळधाण न व्हायची विश्वास देतां मी कुणा
त्याहुन वदो, ' पाषाण हा ! ' जग पाहुनी वरच्या खुणा

अनुक्र. १०५५३ वि: ०६/०८
क्रमांक १३३-११७० नों: दि: २०/३

भालीं तुझ्या कुंकुम नसे, गंभीर मुद्रा यौवनीं
सालंकृता तनु ना तुझी जरि उर्वशी तूं देखणी
बसतेस देवघरामधें तूं केधवां मणि ओढित
पाहून तें हृदयांतरीं चरका बसे दुःखोद्‌भवीं
जें शोभतें योग्य समयीं अन्य समयीं तें चरकवी !

–१३४–

‘ कां सारखा अपुल्याकडे तूं ओढिसी मज दर्पणा ?
कां स्थापिलें मज आपुल्या हृदयांमधें तूं सांग ना ?’
युवती कुणी वदतां असें दर्पण करी प्रत्युत्तर,
‘ छे, ना तुला मी ओढितों, यौवन तुझें तुज ढकलितें
हृदयांत तूं शिरलीस गे ! मी स्थापिलें तुज ना तिथें !’

–१३५–

लावण्य दैवी लाभलें पुण्यें तुझ्या हें निस्तुल
मुनिही कमंडलु टाकुनी धरणें तुझा कर कोमल
तुज अप्सरेची मी परी उपमा कशी देऊं कथ
सद्वर्तनी तूं गे सती, दुर्वर्तनी त्या अप्सरा
त्या अप्सरा चिरयौवना, ग्रासायची तुजला जरा !

-१३६-

'आलीस कां लगबग अशी सरिते ! मला तूं शोधित'
'प्रेमा जडे तूझ्यावरी जो जलनिधे ! पद वळवित !'
'कधिं देखिलें परि तूं मला अर्पावया निज मानसे
'या जन्मीं ना जरि पाहिलें तव वैखरी स्मरवी परी
मागें कधीं असतां तुझी ती ऐकिली तव मंदिरीं !

-१३७-

हातांत ज्याच्या माणिकें त्याच्या करीं यश लौकिक
विद्वान् तो, तो देखणा, जगण्यास तो अन् लायक !
तो सद्‌गुणी त्याच्यापरी नाही कुणी धरणीवरी,
तुज व्हायचें त्याच्यापरी रंका जरी हो तस्कर
धन मिळविणें सोपें तसें, शासील ना जग नंतर !

-१३८-

जर चित्रगुप्ता ! लेखणी खालीं तुवां पळ ठेवली
बघशील ही सारी धरा नरशोणितानें नाहली
नाहीं कुणी या भूतलीं जो ना कुणा वांछी मृत
प्रभुमंदिरीं, गणिकागृहीं, मार्गावरी, एकीकडे
रे चित्रगुप्ता ! शिंपिले जातील रक्ताचे सडे !

-१३९-

कां दीप मालवुनी तुवां वद घेतलें मम चुंबन
केलेस तूं मुद्दाम कां हे अंध माझे लोचन
वक्षावरी तूं दाबिलें हें श्रांत झालें मस्तक
तमि आंसवें उभयांसही बघ आपुली कळली परी
अभिषेक होतां सारखा हृदयावरी, शीर्षावरी !

-१४०-

तूं आसरा त्यांना जयां नच आसरा देती कुणी
अरि धाडितों जे तुजकडे ना धाडिसी पुनरपि रणीं
साऱ्या जनां वर्तनफलें तूं द्यावया नेसी सदा
प्रगतीपथें करितों त्वरा पाठीकडे तुज पाहुनी
वाणी रमे मम नेहमीं मृत्यो ! तुझ्या स्तुतिगायनीं !

-१४१-

दिन यापरी गेले किती, येतिल किती, जातिल किती,
जन यापरी गेले किती, येतिल किती, जातिल किती,
कुणि एकला तें जाणितो, मी जाणितों हें एवढें,
दिन जायचा हा आजचा येथ असतां मी यापरी
अन् जायचा मी एकला योग्य समयीं कोठें तरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

हक्कें आतां घे विश्रांती
विझूं लागल्या गगनीं ज्योती
अतां व्हायची जनता जागी
स्मृती संपल्या तुझ्या मोजुनी
कार्य संपवी सरती रजनी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ९०४४३ वि: काव्य
क्रमांक ... ९३७ नों: दि: २८/३/८५
REFBK-0008344
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
C3866

पराग